# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त कार्यालय**

मुख्यालय, २ रा मजला,स्व. इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र. २८१९२८२८
ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

पुण्यश्लोक ३००

**जा.क्र.मनपा/आयुक्त/४७/२०२५-२६** **दि.७/८/२०२५**

**कार्यालयीन आदेश**

**विषय :- महानगरपालिकेच्या विविध विभागातील वार्षिक / द्विवार्षिक मुदतीच्या निविदांची मुदत संपण्याआधी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत..**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विभागांची वार्षिक / द्विवार्षिक मुदतीची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती कामे, साहित्य खरेदी, दैनंदिन साफसफाई, उद्यान व वृक्षप्राधिकरणाकडील वार्षिक / द्विवार्षिक मुदतीने करण्यात येणारी दैनंदिन देखभाल व दुरुस्ती कामे व आरोग्य विभागातील औषध खरेदी कामांसाठी ई-निविदा प्रक्रिया करुन निविदा रक्कम व मुदत निश्चित करुन कंत्राटदार / पुरवठादार यांना कार्यादेश देण्यात येतात. कार्यादेशातील मुदत व रक्कम संपण्यापूर्वी सदर कामाकरीता आवश्यक निविदेची विहित प्रक्रिया करुन नवीन कंत्राटदार यांना कार्यादेश देणे बंधनकारक आहे.

तथापि, संबंधित विभागातील संचिका हाताळणारे कर्मचारी / अधिकारी, विभागप्रमुख / खातेप्रमुख यांच्याकडून सदर बाबींकडे दुर्लक्ष केल्याने नवीन कंत्राटदार नेमण्यास विलंब होऊन जुन्या कंत्राटदारांना मुदतवाढ देणे, निविदेतील मंजूर रक्कमेपेक्षा जास्त खर्च होणार असल्याने सुधारीत व वाढीव रकमेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर होत असतात. सदर बाब गंभीर व प्रशासकीय तसेच वित्तीय शिस्तीस धरुन नाही.

याबाबत यापुर्वीही आदेश देण्यात आलेले आहेत. वरीलप्रमाणे वार्षिक / द्विवार्षिक मुदतीच्या आणि इतर सर्व निविदांमध्ये वाढीव व सुधारीत खर्चास मान्यता देणे व मुदतवाढ देण्याचे प्रस्ताव सादर झाल्यास त्यासाठी जबाबदार असणाऱ्या संबंधितांना जबाबदार धरुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच सर्व विभागप्रमुख/ उपायुक्त यांनी मुदतवाढीचे प्रस्ताव चर्चा केल्याशिवाय व समर्थनीय कारणे असल्याशिवाय सादर करु नयेत. तसे आढळून आल्यास विभागप्रमुख / उपायुक्त यांना देखील जबाबदार धरुन कारवाई करण्यात येईल. समर्थनीय कारणाशिवाय व विभागाच्या निष्काळजीपणामुळे निविदा काढण्यास विलंब होऊन मुदतवाढ द्यावी लागल्यास संबंधितावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपील) १९७९ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ नुसार शिस्तभंगाची कारवाई करुन प्रस्तावाबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

(राधाबिनोद शर्मा)
**आयुक्त तथा प्रशासक** भा.प्र.से.
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

१) अति. आयुक्त १ व २
२) उपायुक्त (सर्व)
३) मुख्यलेखापरीक्षक
४) मुख्य लेखा व वित्त अधिकारी
५) शहर अभियंता
६) कार्यकारी अभियंता (सर्व)
७) सर्व खातेप्रमुख / विभाग प्रमुख / उपायुक्त